| MHPU080012162013 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | ०७/११/२०१३ |
| | नोंदणी तारीख | – | ०७/११/२०१३ |
| | निकाल तारीख | – | २१/०८/२०२६ |
| | कालावधी | – | १२व. ०९म. १४दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फौजदारी न्यायालय, खडकी.**

**(पिठासीन अधिकारी – पी.एस.आपटे)**

**नि.फौजदारी खटला क्रमांक ७००२९०/२०१३** **नि.क्र. ३७**

(**पोलीस स्टेशन – भोसरी** येथील **गुन्हा नोंद क्र. १९१/२०१३** भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४)

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/ फिर्यादी** | – | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>भोसरी पोलीस स्टेशन. |
| **सादरकर्ते** | – | सहायक सरकारी वकील श्रीमती पी. डी. जाधव |
| **आरोपी** | – | **१) मुमताज अली मकानदार**<br>वय – ५८ वर्षे, कामधंदा – गृहिणी<br>**२) रुक्साना अली मकानदार**<br>वय – ३३ वर्षे, कामधंदा – गृहिणी<br>**३) शबाना अली मकानदार**<br>वय – ३५ वर्षे, कामधंदा – गृहिणी<br>**४) नाझनीन अली मकानदार**<br>वय – ३२ वर्षे, कामधंदा – गृहिणी<br>वरील सर्व रा. बुद्धविहार समोर, दापोडी, पुणे. |

| | | |
|---|---|---|
| | | **५) अली अब्दुल गनी मकानदार (मयत)** |
| **सादरकर्ते** | – | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. बी. जाधव |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | – | माहे नोव्हेंबर २०१० ते जुलै २०१३ या कालावधीत |
| फिर्याद दाखल तारीख | – | १६/०७/२०१३ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | ०७/११/२०१३ |
| दोष नोंदवलेची तारीख | – | ०७/०८/२०१४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | – | ०५/०८/२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | – | -- |
| निकालाची तारीख | – | २१/०८/२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर. | – | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हया खाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | भा.ना.सु.सं. कलम ४६८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहा तील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मुमताज अली मकानदार | २१/१० /२०१३ | २१/१० /२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८–अ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २) | रुकसाना अली मकानदार | २१/१० /२०१३ | २१/१० /२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८–अ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३) | शबाना अली मकानदार | २१/१० /२०१३ | २१/१० /२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८–अ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ४) | नाझनीन अली मकानदान | २१/१० /२०१३ | २१/१० /२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८–अ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ५) | अली अब्दूल गनी मकानदार (मयत) | २१/१० /२०१३ | २१/१० /२०१३ | भा.दं.वि. कलम ४९८–अ | निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. सरकारतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा. क्र.१ | नाझीया उर्फ नाझनीन हुसेन अली मकानदार | फिर्यादी (नि. ३०) |

### ब. बचाव पक्षातर्फे नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत नोंदवलेल्या साक्षीदारांची यादी**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन पुरावा निशाणी क्रमांकाची यादी**

**अ. सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | पी–१ | फिर्यादीची जबाबावरील सही |
| ०२ | पी–२ | प्रथम छापील खबरी अहवालावरील फिर्यादीची सही |

**ब. बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | १५ | दोषारोप |
| ०२ | १६ | आरोपी क्र. १ ची जबानी |
| ०३ | १७ | आरोपी क्र. २ ची जबानी |
| ०४ | १८ | आरोपी क्र. ३ ची जबानी |

| | | |
|---|---|---|
| ०५ | १९ | आरोपी क्र. ४ ची जबानी |
| ०६ | २० | आरोपी क्र. ५ ची जबानी |

**ड. महत्वाच्या वस्तू / मटेरियल ऑब्जेक्ट**

| अ.क्र. | निशाणी/वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

## न्यायनिर्णय
## (दिनांक २१/०८/२०२६ रोजी घोषित)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८-अ, ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये अपराधांकरीता दोषारोप दाखल करणेत आले आहे.

२) अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे-

फिर्यादी नाझीया उर्फ नाझनीन हुसेन अली मकानदार यांचे हुसेन अली मकानदार यांचे बरोबर मुस्लीम धर्मपद्धतीने लग्न झाले होते. लग्नानंतर त्या त्यांचे पती, सासू-सासरे व तीन नणंदा यांचेसह जुनी सांगवी येथे भाडयाचे खोलीमध्ये राहत होत्या. लग्नानंतर चार महिन्यांनी त्यांचे पती, सासू, सासरे व नणंदा यांनी किरकोळ घरगुती कारणावरुन त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली होती. हुसेन अली मकानदार यांचा हातगाडीवर भंगार गोळा करण्याचा व्यवसाय असून त्यांना दारु पिण्याचे व्यसन होते. ते राहत असलेले भाडयाचे घर खाली करणेस घरमालकाने सांगितलेने ते माहे नोव्हेंबर २०१० मध्ये गुलाबनगर, दापोडी, पुणे येथे भाडयाने राहत होते. त्याठिकाणी फिर्यादीचे पती, सासू, सासरे व नणंदा यांनी नवीन घर घेण्यासाठी फिर्यादीकडे माहेरुन पैसे आणणेची मागणी केली होती. त्याकारणावरुन आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन, हाताने, लाथाबुक्क्याने मारहाण करुन मानसिक व शारीरिक त्रास देत होते. त्याबाबत

फिर्यादीने त्यांचे माहेरी सांगितले असता त्यांनी फिर्यादीची समजूत काढली होती. त्यानंतर देखील आरोपी फिर्यादीस त्रास देणे सुरुच ठेवले होते.

३) अभियोग पक्षाचे पुढे कथन असे की, माहे एप्रिल २०११ मध्ये पुन्हा फिर्यादी आरोपींसह दापोडी येथे राहावयास आल्या होत्या. त्याठिकाणी देखील आरोपी नवीन घर घेण्यासाठी त्यांचे पैशांची मागणी करत होते तसेच त्यांना शिवीगाळ करुन, हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करुन शारीरिक व मानसिक त्रास देत होते. त्यानंतर आरोपींचा त्रास जास्त झाल्याने त्या त्यांचे मुलांसह त्यांचे माहेरी राहणेस गेल्या होत्या. त्यानंतर माहे जुन २०१३ मध्ये त्यांनी त्यांचे पती विरुद्ध खडकी येथील न्यायालयात तक्रार दाखल केली होती. त्यावेळी त्यांचे पतीने त्यांना तक्रार मागे घेण्यास सांगितले असता त्यांचे पतीने बीअरची बाटली फिर्यादीचे डोक्यावर, हातांवर तसेच शरीरावर मारुन जखमी केले होते. त्यानंतर फिर्यादीने वाय.सी.एम. दवाखान्यात उपचार घेवून दापोडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

४) सदर तक्रारीच्या आधारे आरोपींविरुध्द भोसरी पोलीस ठाण्यात **गुन्हा क्र. १९१/२०१३** नोंदविण्यात आला होता. तपासाअंती आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२४, ३२३ व ५०४ सह कलम ३४ अन्वये कलमान्वये दंडनिय अपराधांकरीता प्रस्तुत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

५) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये दोष निश्चित करुन दोषारोप पत्रातील मजकूर आरोपींना वाचून समजावून सांगीतला. आरोपींनी निशाणी १६ ते २० प्रमाणे दोषातील आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. खटला प्रलंबित असतांना आरोपी क्र. ५ अली अब्दुल गनी मकानदान हा मयत झाल्याने त्याचे विरुद्ध खटला वगळणेत आला.

६) अभिलेखावर आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळून आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) नुसार जबाब निशाणी ३३ ते ३६ वर नोंदविण्यात आला.

७) अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील व आरोपींचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. खटल्यातील पुरावा व कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याच्या न्यायिक निकालासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | माहे नोव्हेंबर २०१० ते जुलै २०१३ या कालावधीत बुद्धविहारासमोर, दापोडी, पुणे येथे आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीकडे नवीन घर घेण्यासाठी माहेरुन पैसे आणणेची गैरकायदेशीर मागणी केली व ती पूर्तता करण्याकरीता फिर्यादीचा शारीरिक व मानसिक छळ केला होता म्हणुन भारतीय दंड विधान कलम ४९८–अ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २) | अंतिम आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ करिता –

८) फिर्यादी नाझीया उर्फ नाझमीन (सा.क्र.१) हया सदर खटल्यातील महत्वपुर्ण साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या सरतपासात सांगितले की, आरोपी क्र. १ ही त्यांची सासू व आरोपी क्र. २ ते ४ हया नणंदा असून आरोपी क्र. ५ हे त्यांचे सासरे होते. सन २००७ मध्ये त्यांचे हुसेन अली मकानदार यांचे सोबत लग्न झाले होते.

लग्नानंतर ५ ते ६ महिने आरोपी त्यांचे सोबत चांगले वागले. त्यानंतर त्यांचेमध्ये काम न केल्याच्या कारणावरुन वाद होवून त्यांना मारहाण करत होते. त्यांचे पती त्यांना कोणत्याही वस्तूने त्यांना मारहाण करत होते. त्यामुळे त्यांनी आरोपींविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर त्यांचे पती व इतर आरोपींनी त्यांचे माहेरी येउन त्यांचे आईवडिल व भावाला मारहाण केली होती. या व्यतिरिक्त त्यांचे सोबत आणखी कोणतीही घटना घडली नाही. त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर व दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करणेपूर्वी त्यांचे पती अपघातात मयत झाल्याचे सांगितले. त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान फिर्यादीतील मजकूर माहित नसल्याचे कथन केल्याने अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदारास फितूर घोषित करुन सुचक प्रश्न विचारणेत आले. त्यामध्ये त्यांनी त्यांचे पती दररोज रात्री दारु पिउन नवीन घर घेण्यासाठी शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करत होते तसेच त्यांचे सासू, सासरे व तिन्ही नणंदा त्यांना घरातील कामे करण्यास सांगून त्यांना उपाशी ठेवून त्यांचा मानसिक व शारिरीक छळ करत होते तसेच त्यांचे पतीने त्यांना न्यायालयात दाखल केलेला दावा मागे घेण्याच्या कारणावरुन त्यांचे पती यांनी बीअरची बाटली त्यांचे डोक्यात, हातांवर, गळयावर, मानेवर व पाठीवर मारुन जखमी केले केले होते, ही बाब नाकारलेली आहे. अशाप्रकारे, फिर्यादीने फितुर होवुन अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. उलटतपासात फियादीने त्यांचे आरोपीसोबत तडजोड झाल्याचे मान्य केले आहे. आरोपी पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आला. आरोपींनी नवीन घर घेण्याकरिता फिर्यादीकडे माहेरुन पैसे आणण्याची मागणी केली तसेच त्या घरात काम न करण्याच्या कारणावरुन त्यांना मारहाण करत होते तसेच त्यांचे पती त्यांना कोणत्याही वस्तूने मारहाण करत होते त्यामुळे त्यांनी तक्रार दिली होती ही बाब त्यांनी उलटतपासात नाकारलेली आहे. एकंदरीतच फिर्यादीच्या साक्षीमधुन

९) याठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, फिर्यादी नाझीया उर्फ नाझनीन (सा.क्र.१) व आरोपींनी अभिलेखावर निशाणी क्र. ३१ वर संयुक्त पुरसीस दाखल केली की, त्यांचे मध्ये न्यायालयाबाहेर आपसात समजोता झालेला असून त्यांना आरोपींविरुध्द यापुढे खटला चालवावयाचा नाही तसेच शासन तर्फे घेण्यात

आलेल्या उलटतपासात फिर्यादी नाझीया उर्फ नाझनीन (सा.क्र.१) यांनी हे मान्य केले की, त्यांची आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे व त्यांना आरोपींविरुध्द पुढे खटला चालवावयाचा नाही. एकंदरीत सदर प्रकरणातील तडजोड झाल्याने व फिर्यादी नाझीया उर्फ नाझनीन (सा.क्र.१) हया फितूर झाल्याने आरोपींविरुध्द पुरावा अभिलेखावर आला नसल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत अभियोग पक्षाच्या कथनावर संशय निर्माण होत आहे व आरोपी हे संशयाचा फायदा घेणेस पात्र ठरले आहेत.

१०) आरोपीने फिर्यादीकडे नवीन घर घेण्यासाठी माहेरुन पैसे आणणेची गैरकायदेशीर मागणी करुन तिचे पूर्तता करण्याकरीता त्यांना हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली होती तसेच त्यांचा शारिरीक व मानसिक छळ केला होता, या स्वरूपाचा कसल्याही प्रकारचा पुरावा अभिलेखावर अस्तित्वात नाही. उपलब्ध पुराव्याच्या व कायदेशिर तरतुदींच्या पार्श्वभूमीवर आरोपींच्या विरूध्द शिक्षापात्र अपराध सिध्द करण्यास अभियोग पक्ष निष्फळ ठरला आहे हे स्पष्ट होते. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> :–**

११) वरील नकारार्थी उत्तराच्या अनुषंगाने मी मुददा क्र. २ च्या उत्तरा करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ मुमताज अली मकानदार, आरोपी क्र. २ रुकसाना अली मकानदार, आरोपी क्र. ३ शबाना अली मकानदार व आरोपी क्र. ४ नाझनीन अली मकानदार यांची भारतीय दंड विधान कलम ४९८–अ च्या दंडनिय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) मधील तरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे स्वबंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपी क्र. १ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रु.१५,०००/– चा जामीन कदबा सादर करावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात येत आहे.

PRAJKTA SHIRISH APTE

Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE
Date: 2026.08.21 17:32:52 +0530

(पी. एस. आपटे)

दिनांक २१/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

फौजदारी न्यायालय, खडकी.

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर मूळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | योगेश के. कोटस्थाने |
| न्यायालयाचे नाव | – | पी.एस.आपटे<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, खडकी, पुणे |
| आदेश/न्यायनिर्णय जाहीर केलेची दिनांक | – | २१/०८/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | २१/०८/२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – | २१/०८/२०२६ |